<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

**प्रेस नोट दि.१२/०७/२०१८**

<u>दि.११/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८१०/१८,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | मंगेश भांगे,पो.उप.निरी. हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | १.प्रतिक ऊर्फ नोन्या संजय वाघमारे,वय-१९ वर्षे,रा.शांतीनगर वसाहत,हडपसर,पुणे २.पंकज धनंजय जाधव,वय-१९ वर्ष,रा.महादेव नगर मांजरी,पुणे ३.आकाश दादासो भापकर,वय-१९ वर्षे,रा.कवडीपाट,लोणी-काळभोर,ता.हवेली,जि.पुणे ४.रुपेश सुभाष कोळी,वय-२१ वर्षे,रा. महादेव नगर,मांजरी,हडपसर,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०१८ रोजी ०२/३० वा. द्राक्ष संशोधन केंद्र समोर सोलापुर-पुणे रोडवर हडपसर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे दोन लोखंडी कायते, एक चाकु, मिरची पावडर इत्यादी घातक शस्त्रे तसेच मोटार सायकल नं. एमएच/१२/एनजी/९२१२ व मोटार सायकल नं.एमएच/१२/एलडब्ल्यु/८१८० असा सर्व मिळुन एकुण ८०,३००/- रुपये किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,हडपसर पुणे-सोलापुर जवळील रोडवर पेट्रोल पंपावर स्वतःचे आर्थिक फायद्या साठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ ते ४ मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भांगे ८८०५३३३०३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीपठ पो स्टे ३४९/१८,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | संजय पाठक,वय-४० वर्षे,रा.साईपार्क,दिघी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०६/२०१८ रोजी १८/०० ते दि.०८/०६/२०१८ रोजी पहाटे ०५/३० वा.चे दरम्यान स.नं. ४६,जांभुळवाडी,ता.हवेली,जि.पुणे येथे मधुकर जांभळे यांचे जागेतील एअरटेल टॉवर सेंटरचे रूम मध्ये |
| **तपशिल** | वर नमुद ठिकाणी एअरटेल टॉवर सेंटरचे रूम मध्ये बसविलेले अमर राजा ए.एच. कंपनीच्या ६०० होल्टेजच्या एकुण २४ बॅट-या,कोणीतरी अज्ञात इसमाने,एअरटेल टॉवर सेंटर रूमचे उघडया असणा-या जाळीतुन आत प्रवेश करून ९६,००० रू किमतीच्या चोरी करून नेल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.ना. यु.एस.मोकाशी ९६२३४४२७०७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २३०/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | नंदकुमार जाधव,वय-४७ वर्ष,पी.एम.पी.एम.एल.सुरक्षा विभाग,स्वारगेट,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०७/२०१८रोजी २१/०० वा. चे दरम्यान बीआरटी बस स्टॉप फुलेनगर,आळंदी रोड, येरवडा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पी.एम.पी.एम.एल. सुरक्षा विभाग,शंकरशेठ रोड,स्वारगेट,पुणे येथे सिक्युरिटी इन्चार्ज म्हणुन गेली १० वर्षापासुन नोकरी करीत आहे. बीआरटी बसस्टॉप फुलेनगर,आळंदी रोड,येरवडा,पुणे येथील बीआरटी बस स्टॉपवरील प्रवाशांचे सोयीसाठी लाईट एलईडी स्क्रीनसाठी लावण्यात आलेले एक इक्साईड पॉवरसेफ कंपनीची १२ व्होल्टची बॅटरी ५,०००/- रू किची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरीच्या इराद्याने तेथे डयुटीस असलेल्या सुरक्षा रक्षकांची नजर चुकवुन चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. डी.पी.राऊत ८८८८८११२८४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**